# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

वार, दिनांक
(वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी १.००)
(एकूण गुण - १००)

## प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

सूचना:- प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**प्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :- गुण २०**

**१.** डॉ. भिमराव रामजी आंबेडकर अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एम.ए., पी.एच.डी., डी.एससी., एलएलडी, डि.लिट., बार-ॲट लॉ, यांनी स्वतः च्या आयुष्यात सतत सामाजिक न्यायाचा पुरस्कार करून ते देशातील सर्व स्त्रियांचे प्रेरणास्थान झाले. आजच्या स्त्री चळवळीला बाबासाहेबांनी लोकशाहीचा भरभक्कम पाया दिला. भारतीय संविधानाच्या या शिल्पकाराने या देशातील स्त्रियांची स्थिती, त्यांच्या जीवनातील अगतिकता, समझोते, शोषण, विषमता, गुलामगिरी, सारे ओळखले होते. त्यांच्याकरिता सर्व क्षेत्रात "कायदेशीर" समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय दिलाच पाहिजे असाच जणू बाबासाहेबांचा संकल्प होता. म्हणूनच संविधानाच्या अनुच्छेद १४ पासून अनुच्छेद २१ पर्यंत त्यांनी स्त्रियांना कायद्याने समता व सामाजिक न्याय मिळवून घेण्याच्या तरतुदी करून ठेवल्या आहेत. त्यांनी हिंदू कोड बिलाने स्त्रियांवरील अनेक अत्याचारांना वाचा फोडली आहे. तसेच द्विभार्या प्रतिबंधक कायदा, विवाहाचा विशेष कायदा, वारसाहक्क, शिक्षणातील व अर्थार्जनातील समता कायद्यासमोरील समता या सर्व सुधारणांमुळे स्त्रियांना न्यायासाठी संघर्ष करण्याला साधने दिली. म्हणूनच स्त्रिया स्वतःच्या चळवळी उभारू शकल्या. लोकशाही पध्दतीने आंदोलने, निदर्शने, मोर्चे, सभा संम्मेलने आयोजित करण्याचे विचार बाबासाहेबांच्या जीवन संघर्षातून व लोकशाहीच्या समर्थनातून स्त्रियांनी मिळविले आहेत. बाबासाहेबांच्या विचारांनीच स्त्रियांच्या चळवळीला तात्त्विक व नैतिक बैठक दिली. आंबेडकरी विचारांनी उभारलेली स्त्री-चळवळ स्त्रियांना किती समजली आहे हा मात्र चिंतनाचा विषय आहे.

**प्रश्न :-**

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोंणत्या पदव्या संपादित केल्या ?

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या चौदाव्या अनुच्छेदापासून एकविसाव्या अनुच्छेदापर्यंत स्त्रियांना काय मिळवून घेण्याच्या तरतुदी केल्या आहेत ?

(३) आजच्या स्त्री-चळवळीचा पाया बाबासाहेबांनी कशाप्रकारे रचला आहे?

(४) कोणाच्या विचारांनी स्त्रियांच्या चळवळीला तात्त्विक व नैतिक बैठक दिली ?

(५) स्त्रियांसाठी बाबासाहेबांचा कोणता संकल्प होता ?

२. आपण सुंदर दिसावे ही इच्छा स्वभावतःच प्रत्येक मनुष्यप्राण्यांत असते. परंतु फक्त आनंदी होणे हे सुंदर दिसण्याचे एक अति सोपे साधन आहे, हे फारच थोडयांस ठाऊक असते व हे ज्यांना माहित असते ती मंडळी नट्टापट्टा केल्याशिवायच सुंदर दिसत असतात.तोंड धुऊन पुसून, केश विंचरून दागदागिने घालून व मूल्यवान उंची पोषाख करून सुंदर दिसण्याची सर्व तयारी केली, व चेहराच फक्त दुःखी ठेविला, तर अशा मनुष्यास सुंदर कोण बरे म्हणेल ! दुःखी स्थितीत त्याचप्रमाणे आनंदी स्थितीत आपली तसबीर काढल्यास कोणची तसबीर आपण नेहमीच आपणाजवळ ठेवू, ह्याचा प्रत्येकाने स्वतःशी विचार करावा. आपण सुंदर दिसतो की नाही हे आरशांत पाहण्यापेक्षा, आपण आनंदी दिसतो की नाही हे वारंवार आरशांत पाहात जा. फक्त आनंदी होणे हे एक सुंदर दिसण्याचे रहस्य आहे. सुंदर चेहरा दुःखी चेहरा हे कधी तरी आपण एके ठिकाणी पाहातो का ? दुःखी झाल्याबरोबर सौंदर्य पार निघून जाते, हे मात्र नेहमी आपण पाहातो. बिनखर्चाने व फार थोडया त्रासांत सुंदर दिसावे अशी इच्छा असल्यास फक्त आनंदी व्हा व नेहमी आपला आनंद कायम ठेवा, म्हणजे दागिने व उंची वस्त्रें परिधान केल्याशिवाय तुम्ही सुंदर दिसूं लागाल. आनंदी होणे हा सौंदर्याचा एक मुख्य दागिना आहे.

फक्त आनंदी व्हा, म्हणजे आयुष्यातील अर्ध्या दुःखाचे ओझे नाहीसे होईल. आनंदी व्हा, म्हणजेच दररोजचे कठिण वाटणारे काम सुखदायक होईल. आनंदी व्हा म्हणजे सर्वात कठिण प्रसंगाशी तोंड देताना व अतिकठिण प्रमेयें सोडवितांना देंखील तुम्हाला अत्यंत आनंद वाटू लागेल.

**प्रश्न :-**

(१) प्रत्येक मनुष्याची स्वाभाविक इच्छा कोणती असते ?
(२) सुंदर दिसण्यामागचे रहस्य कोणते आहे ?
(३) सौंदर्याचा मुख्य दागिना कोणता ?
(४) आनंदी असण्याचे कोणते फायदे लेखकाने संगितले आहेत ?
(५) या उताऱ्यास सुयोग्य शीर्षक द्या.

३. लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले, लोकांबरोबर परंपरेने चालत आलेले, लोकभाषेतून अभिव्यक्त होणारे साहित्य म्हणजे लोकसाहित्य. या लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासक डॉ.सरोजिनी बाबर यांची प्राणज्योत२० एप्रिल, २००८ रोजी मालवली. डॉ.सरोजिनी बाबर यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बागणी या गावात ७ जानेवारी, १९२० साली झाला. ज्या काळात चूल आणि मूल हेच स्त्रियांचे क्षेत्र होते त्या काळात त्यांच्या वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मुंबई विद्यापीठात कला शाखेतून त्या प्रथम आल्या. "मराठी लेखिकांचे योगदान" या विषयावर त्यांनी पी.एच.डी. ही पदवी संपादन केली. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन कारावासही पत्करला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमदार तसेच राज्यसभेत त्या खासदार म्हणूनही निवडून आल्या होत्या. दोन प्रबंध, सात कादंबऱ्या, ३६ कथासंग्रह, ललित लेख त्यांच्या नावावर जमा आहेत. त्यांनी लोकसाहित्याच्या केलेल्या सेवेमुळे मराठी साहित्यात त्यांचे नाव कायमचे कोरले गेले. सरोजिनीबाईंनी विवाह केला नव्हता. किंबहुना त्यांनी लोकसाहित्याशी विवाह केला होता असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. हे साहित्य गोळा करण्यासाठी त्या महाराष्ट्रात खेडोपाडी फिरल्या. विशेषतः स्त्रियांशी त्यांच्या भाषेत संवाद साधला. "आदिवासींचे सण उत्सव" हे त्यांचे पुस्तक वाचताना याची प्रचिती

येते. "एक होता राजा", "साजशिंगार", "लोकसाहित्यमाला" ही त्यांची पुस्तके संस्कृतीच्या अभ्यासकाना उपयुक्त ठरली. संपूर्ण महाराष्ट्राच्या लोकसाहित्याचे संकलन ३० खंडात त्यांनी केले आहे. "समाजशिक्षण माले" सारखा सेवाभावी उपक्रमही त्यांनी राबविला. पुणे तसेच टिळक विद्यापीठातर्फे डी.लिट. , भारती विद्यापीठातर्फे जीवनगौरव पुरस्काराने त्याना सन्मानित करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठातर्फे "जीवनसाधना" या पुरस्कारने त्यांचा गौरव करण्यात आला.

**प्रश्न :-**

(१) लोकसाहित्य म्हणजे काय ?
(२) डॉ.सरोजिनी बाबर यांचे शिक्षण कोणत्या काळात झाले ?
(३) डॉ.सरोजिनी बाबर यानी कोणत्या विषयावर पी.एच.डी. ही पदवी संपादन केली ?
(४) डॉ.सरोजिनी बाबर यांच्या नावे कोणते साहित्य जमा आहे ?
(५) डॉ.सरोजिनी बाबर यांना कोणत्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले ?

**४.** "मद्र देशात श्यामला नावाची एक अनुपम सुंदरी राहत होती. तिच्या रूपाची ख्याती दूरपर्यंत पोहोचली होती; पण तिचे मन बसले ते एका परदेशी गौरवर्णी मुसाफिरावर. प्रेमात शाहणीसुरती माणसं वेडी होतात. मग श्यामलेची काय कथा ? तिला आपल्या सावळ्या रंगाचा एकदम तिटकारा आला. गोरे होण्यासाठी मग ती कानी पडेल तो उपाय करू लागली. झटपट गोरेपण देणारे एक मलम तिने लावले आणि थोडयाच दिवसांत तिच्या त्वचेवर पांढुरकेपण दिसू लागले. उल्हसित होऊन ती ते मलम नेमाने लावू लागली , तर काय दुर्दैव! तिचा सुंदर चेहरा डागांनी, मुरमांनी भरून गेला. चेहऱ्याचा रंग पून्हा सावळा झाला व कांतीची लकाकीही हरपली. एवढेच नाही तर, गौरवर्णाच्या प्राप्तीसाठी ती करत असलेल्या प्रयत्नांची माहिती तिच्या प्रियकराला कळताच तो तिला सोडून गेला. अर्थात् मनुष्य स्वभावाचे ज्ञान माझ्यापेक्षा तुला जास्त असल्याने त्याच्या या कृतीमागील रहस्य तूच मला सांगू शकशील. मी फक्त तुला श्यामलेच्या सौंदर्यनाशाचे कारण सांगतो. श्यामलेने लावलेल्या सौंदर्यप्रसाधनात विरंजक नावाचा घटक होता. त्याची त्वचेवर प्रक्रिया झाल्यामुळे तिच्या त्वचेचा रंग वरपांगी पांढुरका झाला, पण हा तवंग थोडे दिवसच टिकला व लवकरच तिला पूर्वीचा वर्ण प्राप्त झाला; पण त्याबरोबर तिच्या कोमल त्वचेला, प्रसाधनातील जालीम रसायने न मानवल्यामुळे त्वचेवर डाग पडले, पुटकुळ्या उठल्या व कांतीचे तेज हरपले. कारण निस्तेज पांढुरकेपणा म्हणजे काही सौंदर्य नव्हे."

वेताळाचे बोलणे संपताच राजा म्हणाला, "माझ्या बुध्दीवर आलेले झापड दूर केल्याबद्दल मी तुझा ऋणी आहे. "तुझे आहे तुजपाशी" हेच खरे. माझ्या पट्टराणीच्या अलौकिक सौंदर्याची जादू माझ्यावर असूनही, गोऱ्या रंगाच्या आकर्षणापायी मी तिच्यावर खरेच अन्याय केला.त्वचेच्या रंगावरून सौंदर्याचे मोजमाप करणे हा मूर्खपणाच. कारण श्यामलेने ज्या रंगाच्या ध्यासापायी स्वत:चे नुकसान करून घेतले तो गोरा रंग तिच्या प्रियकराच्या आवडीचा नव्हताच. इतर गोऱ्यांप्रमाणे त्यालाही सावळया रंगाचेच आकर्षण

होते. म्हणूनच तो तिला सोडून गेला.

**प्रश्न :-**

(१) श्यामलेला आपल्या काळया वर्णाचा तिटकारा का आला ?
(२) गोरा वर्ण होण्यासाठी श्यामलेने केलेल्या उपायाचा काय परिणाम झाला ?
(३) श्यामलेचे सौंदर्य कशाने नष्ट झाले ?
(४) राजा वेताळाचा कशासाठी ऋणी आहे ?
(५) श्यामलेचा प्रियकर तिला सोडून का गेला ?

**५.** माझे दुसरे दैवत विनय होय. मी कोणाची याचना केली नाही. माझं ध्येय असं होत की, माझं पोट तर भरलं पाहिजे आणि माझ्या लोकांची सेवा केली पाहिजे. डॉ. परांजपे यांच्या विनंतीनुसार एका महाविद्यालयात इकॉनॉमिक्सचा प्रोफेसर झालो. तेव्हा त्यांनी मला तेरा व्याख्यानं देण्यासाठी सांगितलं, पण मी म्हणालो, "फक्त चार व्याख्यानं देईन, पटलं तर ठेवा नाही तर माझा मार्ग मोकळर आहे." कारण मला माझ्या लोकांची सेवा करायची होती. त्यासाठी वेळ हवा होता. पोयबावडीच्या नाक्यावरच्या ४८ व ५० नंबरच्या खोलीत मी कण्याभात आणि कण्यांची भाकरी परत खाल्ली. पण समाजसेवेला सोडून भारी पगाराकडे वळलो नाही. मी माझे स्वतः चे पोट स्वतःच भरून जी काही सेवा करायची ती केली. नोकरी मला करायची नव्हतीच. कोणीही गव्हर्नर जनरल येवो, त्याच्याशी माझी मैत्री असे. परंतु मी कोणाजवळही याचना केली नाही की, मला हे बनवा किंवा मला ही जागा द्या हो ! दुसऱ्यांसाठी मी काही केलं असेल, पण स्वतः साठी एक बोटभर चिठ्ठी लिहिल्याचं कोणीही दाखवून द्यावं.

एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर व्हावं ही मात्र माझी दांडगी इच्छा होती. ती पुरी झाली. आता मला ना पेन्शन, ना पगार, ना प्रॉ. फंड--काही नाही. एकदा इंग्रजांच्या राज्यात कौन्सिलरशिप पत्करली. एकदा काँग्रेसच्या राज्यात, पण तेथेही माझा काँग्रेसशी माझा खटका उडाला. मला जज्ज होता आलं असतं, पण नोकरीतून अडकून घेऊन करणार काय ? तेव्हा माझं सांगणं हेच की दीनता असू नये. मी काही तरी आहे असं मानलं पाहिजे. मी परमेश्वराला कमी मानतो इतका माझा स्वाभिमान तळपत आहे.

**प्रश्न :-**

(१) लेखकाचे दुसरे दैवत कोणते आणि त्याचे ध्येय कोणते आहे ?
(२) डॉ. परांजपे यांना डॉ. आंबेडकरांनी काय सांगितले ?
(३) पोयबावडीच्या नाक्यावर लेखक कुठे आणि कसा रहात असे ?
(४) गव्हर्नर जनरल आला तरी लेखकाचे वागणे कसे असे ?
(५) लेखक एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर झाल्यावर काय घडले ?

**६.** डॉ. पंजाबराव देशमुख हे स्वतः हाडाचे शेतकरी होते. भारतीय शेतकऱ्याच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य त्यांनी भोगलेले होते. भोवतालच्या शेतकऱ्याचे दैन्य, अज्ञान,

उपासमार, कष्ट, अवहेलना, पिळवणूक त्यांनी पाहिलेली होती. त्यामुळे त्यांचे हृदय पिळवटून निघाले होते. त्यातून त्यांच्या आयुष्याचे ध्येय आकाराला आले होते. या ध्येयसिद्धीसाठीच त्यांचे परिश्रम अखंड चालू होते. परिश्रमांना मर्यादा नाही, उसंत नाही, तमा नाही. तो एकअखंड यज्ञ होता. या यज्ञात त्यांनी आपल्या जीवनातील सुख-स्वास्थ्याच्या समिधा सर्मपित केल्या होत्या. डॉ. पंजाबरावांचे जीवन हे सर्मपित जीवन आहे आणि म्हणूनच ते आदर्श जीवन आहे. स्फूर्तिदायक जीवन आहे. या जीवनाला ध्यास शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीचा आहे. त्यांनी अधिकारपदे राबविली आहेत तीही याच ध्येयासाठी जेथे हे शक्य नसेल, तेथे त्या अधिकारपदाचा लोभ सोडून ते पुन्हा येऊन मिसळले ते शेतकऱ्यांतच !

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या कार्याला सुरूवात केली त्यावेळी त्यांना काय आढळले ? विदर्भातील शेतकरी अत्यंत कष्टाळू. वरून सूर्य आग ओकतो तरी शेतकरी शेतात नांगर चालवतो, घामाने ओलाचिंब होऊन कष्ट उपसतो, तो, त्याची बायको, त्याची मुले सर्वजण शेतीत सदासर्वकाळ राबतात, हाडाची काडे करतात आणि सर्वांसाठी अन्नधान्य निर्माण करतात; पण त्याला स्वतःला मात्र खायला नाही, पाण्याची सोय नाही, निवाऱ्याची पुरेशी जागा नाही. दुःख दारिद्र्याने गांजलेला, कर्जाच्या डोंगराच्या भाराखाली वाकलेला, अज्ञानाच्या अंधःकारात लोळत पडलेला. त्याने कष्ट उपसायचे आणि समाजातील वरिष्ठांनी प्रतिष्ठा मिरवायची. सावकारांनी त्याचे शोषण करायचे. ही गरिबी, हे शोषण, ही विषमता हे अज्ञान पाहून कुणाचे अंतःकरण पिळवटून जाणार नाही.

**प्रश्न :**

(१) डॉ. पंजाबराव देशमुख यांचा व्यवसाय कोणता ?
(२) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे ध्येय कोणत्या गोष्टींमधून आकाराला आले होते ?
(३) डॉ. देशमुखांच्या जीवनाला कोणता ध्यास लागला होता ?
(४) डॉ. देशमुखांनी कोणता लोभ सोडला ?
(५) विदर्भातील शेतकऱ्यांच्या स्थितीचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

७. बाबांचे कीर्तन-श्रवण हा एक महान अनुभव आहे. बाबांच्या कीर्तनाचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही. बाबाचे कीर्तन अज्ञांसाठी आहे, गरिबांसाठी आहे, दलितांसाठी आहे, दुःखितांसाठी आहे, त्यात योग नाही, अध्यात्म नाही, पोथी नाही, देवांची वर्णने नाहीत, पुजाऱ्याला यांचा उपदेश नाही. त्यात शुद्ध जीवन आहे. हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रूढीखाली भरडून निघाल्यामुळे दुधखुळया, देवभोळया अन् आंधळया, पांगळया झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजे गाडगेबाबांचे कीर्तन, बाबांच्या कीर्तनाचे तंत्र मोठे विलक्षण आहे. सर्व श्रोत्यांना दोन्ही हात वर करून टाळयांच्या तालावर हे एक भजन करायला सांगतात. "गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला।" अर्धे मिनीट हे भजन चालते आणि मग बाबांच्या समाजवादी कीर्तनाचे कारंजे उचंबळू लागते. त्यांच्या कीर्तनात शेकडो प्रश्न आणि मुद्दे येतात. एकेका मुद्द्याचा ते एकेक टप्पा करतात आणि तो टप्पा लाटेसारखा वाढवीतअसा काही वर नेतात अन् "गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला।" ह्या सांघिक भजनाच्या खडकावर एकदम नेऊन तो

आदळतात. त्यामुळे त्यांचा तो उपदेश थेट श्रोत्यांच्या हृदयात तर शिरतोच पण श्रोते तल्लीन होऊन जेव्हा डोलू लागतात तेव्हा तो उपदेश त्यांच्या रक्तामध्ये आणि देहकणांमध्ये जाऊन भिनतो. बाबांच्या सबंध किर्तनात "गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला।" एवढाच परमेश्वराच्या नावाचा उल्लेख येतो पण त्याचाही उपयोग श्रोत्यांची भाविकता वाढविण्यापेक्षा आपला उपदेश त्यांच्या मनावर नीट ठसावा म्हणून ते करतात.

**प्रश्न :-**

(१) बाबांचे कीर्तन-श्रवण कोणासाठी आहे ?
(२) बाबांच्या कीर्तनात काय आहे आणि काय नाही ?
(३) "देवकीनंदन गोपाला" एवढाच परमेश्वराच्या नावाचा उल्लेख कशासाठी उपयोगी पडतो ?
(४) बाबांच्या कीर्तनाचे तंत्र कसे आहे?
(५) बाबांच्या कीर्तनातून केलेला उपदेश श्रोत्यांच्या कुठेकुठे जाऊन पोहोचता ?

८. 'मदारी' समाज खेडयापाडयांतून, शहरातील सार्वजनिक बागांसमोर, स्टेशनांवर सापाचे व जादूचे खेळ करून पोट भरतो. हडपसर जवळच्या रामटेकडीच्या पायथ्याशी मदारी समाजाच्यापाच-सात झोपडया या दिवसात पडतात.

ही मंडळी धर्माने मुसलमान, करमाळा त्यांचे गाव होते. तिथून महिन्यापूर्वी इथे आली. इथून मुंबईच्या दिशेने जाणार होती. हसन मदारी म्हणाला, "आम्ही पावसाळा इथे काढतो. मुंबईचा पावसाळा आम्हाला परवडत नाही. दिवाळीनंतर तिकडे जातो. आमच्यातले काही लोक दिवाळीच्या वेळी कोकणात जातात. तेव्हा तिथे भात कापणीचा सीझन असतो. हिवाळयात साताऱ्याकडे येतात. तिथे शाळू काढायचा सीझन असतो. सीझन असला की आमच्या बाया मजुरीला शेतात जातात. आम्ही खेळ करून पोट भरतो."

हसनने आपल्या झोपडीत नेले. बांबूच्या पट्ट्यांनी अर्धवर्तुळाकार सांगाडा बनवून त्यावर कापड ताणले होते. झोपडीच्या तिन्ही बाजूंनी पाणी वाहून जायला चर काढले होते. चार-पाच तरूण मुले जमली. गोरीपान, घारे डोळे, डोक्यावर मुसलमानी फरच्या टोप्या.

हसनला धंद्याची माहिती विचारली. तो म्हणाला, "साहेब, आम्हाला जादू करता येत नाही. आमचे हातचलाखीचे प्रयोग. तुमचा रघुवीर थेटरात करतो ते आम्ही रस्त्यावर करतो. हे बघा." असे म्हणून जवळची काडी त्याने हातात धरली. दुसऱ्या हातात कागदाचे तुकडे धरून त्यावर काडी फिरवली. हात मिटून काडी फिरवून उघडताच त्या जागी रुपयाची घडी केलेली नोट निघाली. हसन म्हणला, "साहेब, ही सगळी हातचलाखी. असा आम्हाला कागदाचा ररुपया करता आला असता तर करमाळयाहून रानावनांतून भटकत इथं कशला आलो असतो ? "

**प्रश्न :-**

(१) मदारी लोक काय करतात व हा समाज आपल्याला कोठे कोठे दिसतो ?
(२) मदारी लोकांचे गाव कोणते आणि त्यांचा धर्म कोणता ?
(३) दिवाळीनंतर मदारी कोठे जातात ? तिथे ते काय करतात ?
(४) हसनने हातचलाखीचा प्रयोग कसा केला ?
(५) हातचलाखीचा प्रयोग केल्यानंतर हसनने कोणते स्पष्टीकरण दिले ?

९. अहिल्यादेवी स्वतः रणांगणात लढत. त्यांनी स्त्रियांचीदेखील सेना उभारली होती. त्याबरोबर चातुर्य आणि निष्कपट मैत्री यांचाही त्या वापर करत. एकदा राघोबादादा पेशवे, होळकरांवर स्वारी करायला आले. अहिल्यादेवींनी युद्धाची जय्यत तयारी केली. राघोबादादांना पत्र लिहिले की, "मी स्त्री - या लढाईत हरले, तर माझे हसे होणार नाही. पण तुम्ही हरलात तर तुम्हाला तुमचे तोंड लपवायला जागा उरणार नाही." या पत्रचा राघोबादादांवर इष्ट परिणाम झाला. त्यांनी मैत्रीचा हात पुढे केला. होळकरांविरुद्ध पुनः पुन्हा उठाव करणाऱ्या राजपुतांशी अहिल्यादेवींनी युद्ध केले आणि ते जिंकून त्यांना आपले मित्र केले. पेशवाईतील चतुर कारभारी, नाना फडणीस यांनी अहिल्यादेवींच्या या विजयाबद्दल पुण्यात त्यांचा सन्मान केला. तोफांची सलामी दिली आणि म्हटले, "आजवर आम्ही समजत होतो की, अहिल्याबाई पूजापाठ व धर्मकर्मच करत बसतात. पण आज त्यांचे युद्धातील शौर्यही आम्ही पाहिले. मराठेशाहीला त्यांचा अभिमान वाटतो.

**प्रश्न :-**

(१) राघोबादादांनी अहिल्याबाईंशी मैत्रीचा हात पुढे का केला ?
(२) अहिल्याबाई धर्मकर्म व पूजापाठ याव्यतिरिक्त कोणत्या गोष्टी करीत ?
(३) अहिल्याबाई कर्तव्य कठोर होत्या हे कशावरून दिसून येते ?
(४) अहिल्याबाई रणांगणात लढताना कोणत्या दोन गुणांचा उपयोग करीत ?
(५) अहिल्याबाई "स्त्री शक्तीच्या" जनक आहेत असे का दिसून येते ?

१०. काही वर्षापूर्वी कॉम्प्युटर घेणे म्हणजे एखादी 'मोठी' किंवा 'फार महागडी' वस्तू खरेदी करणे असे होते. सर्वसामान्य मध्यमवर्गीयाला कॉम्प्युटर खरेदी करताना मोजाव्या लागणाऱ्या हजारो रुपयांचा विचार करता कर्ज काढून पैशाची जमवाजमव करावी लागत असे. आता चित्र झपाट्याने बदलत आहे. कॉम्प्युटर उत्पादक कंपन्यांनी मध्यमवर्गीयच नव्हे, कनिष्ठ मध्यमवर्गीयांना परवडतील अशा दरात, केवळ १० हजार रुपयांत विशिष्ट कॉम्प्युटर उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे कॉम्प्युटर घेण्याचे स्वप्न साकारण्यासाठी आता अनेक महिने वाट पाहायला नको. या कॉम्प्युटरच्या किमती कमी असल्या तरी त्यात विविधता आहे. त्यांची वैशिष्ट्येही महागडण्या कॉम्प्युटरच्या तुलनेत वेगळी नाहीत. स्वस्त किंमतीचे कॉम्प्युटर आकर्षक व उपयुक्त आहेत. नव्याने कॉम्प्युटर शिकणाऱ्यांसाठी ते उत्तम आहेत. दीर्घकालासाठी मात्र थोड्या जास्त किंमतीचे व अधिक क्षमतेचे कॉम्प्युटर घेणे फायदेशीर ठरेल. कारण, एकदा का कॉम्प्युटर वापरता येऊ लागला की, कमी क्षमतेच्या कॉम्प्युटरची क्षमता वाढविण्यासाठी वेळोवेळी संबंधित दुकानात जाण्यापेक्षा एकदाच खर्च केलेला बरा.

**प्रश्न :-**

(१) पूर्वी सामान्य माणसाला कॉम्प्युटर घेताना काय करावे लागे ? का ?
(२) कॉम्प्युटर उत्पादक कंपन्यांनी आता कसे कॉम्प्युटर उपलब्ध करून दिले आहेत.?
(३) स्वस्त किंमतीचे कॉम्प्युटर कसे आहेत ?
(४) काही वर्षापूर्वी कॉम्प्युटर खरेदी करणे म्हणजे काय होते ?
(५) थोड्या जास्त किंमतीचे कॉम्प्युटर घेणे फायदेशीर आहे असे लेखक का म्हणतो ?

**११.** बसमध्ये सरांनी सहलीचा उद्देश आम्हाला सांगितला, "मुलांनो, आपल्या पर्यावरणात असंख्य सुंदर पक्षी आहेत. त्यांना आपण आपल्या प्रदूषित वस्तीत बघू शकत नाही, त्या पक्ष्यांची माहिती घेऊन त्यांचे जवळून प्रत्यक्ष दर्शन आपण घेणार आहोत. शहरातील वृक्षतोड व प्रदूषण यामुळे अलीकडे चिमण्या व कावळेही दिसणं दुर्मिळ झालं आहे. ही शहर माणसांनी जंगलं तोडून वसविली व पक्ष्यांची मातृभूमी असलेली ही वनं, त्यांचा हक्काचा निवारा आपणच नष्ट केला व पक्ष्यांचं जगणचं असह्य केलं.

हेच पक्षी पर्यावरण संतुलनाच्या कार्यात आपल्याला फार मोठी मदत करतात. झाडांवरचे व प्राण्यांच्या अंगांवरचे कीटक खाऊन त्यांना निरोगी ठेवतात. तसेच जमिनीवरचेही किडे खाऊन जंगल सुरक्षित ठेवतात. वृक्षसंवर्धान करत ते वन्य प्राण्यांनाही जपतात. निसर्गसंपत्तीची हानी न करता त्यांचा हवा तेवढाच उपभोग घेतात. निसर्गसंपत्तीचे जतन करतात आणि स्वार्थ आणि परमाा कसा साधावा हे आपल्याला शिकवतात.

**प्रश्न :-**

(१) अलीकडे चिमण्या व कावळ्यांचे दर्शन दुर्मिळ का झाले आहे.?
(२) माणसांनी शहर कशी वसविली ?
(३) पक्षी पर्यावरण संतुलनाच्या कार्यात कशी मदत करतात ?
(४) पक्ष्यांकडून आपण काय शिकावे ?
(५) वरील उताऱ्यास समर्पक शीर्षक द्या.

**१२.** गंमत म्हणजे आयुष्यात इतक्या परीक्षा दिल्या त्या खास काही आठवत नाहीत. आठवतात ते परीक्षांचे आदले दिवस, लांबच लांब पसरत गेलेले, न संपणारे, कंटाळवाणे, आदले दिवस. प्रत्यक्ष परीक्षा पटकन संपतात. हातात कोरी उत्तरपत्रिका येते आणि भल्याबुऱ्या प्रकारे दोन-अडीच तासांत भरवून परत केली जाते. परीक्षेच्या अगोदरचा दिवस

कोराच येतो आणि कोराच जातो. जातो कुठला ? नेटानेटाने ढकलावा लागतो. नव्यानं करण्याजोगं काही काम नसतं. त्या दिवसाआधी जो काही अभ्यास करायचा असतो तो वर्षभरात करून झालेला असतो. तो वर्षभरात झेपला नाही तो त्या शेवटच्या दिवशी उरकरण्याची काही आशा नसते. शिवाय एकदम सगळाच अभ्यास चोख आला तर न जाणो पहिले-बिहिले येऊ हे टेन्शन ! पहिलं येऊन आपलच इतक्या वर्षाचं रेकॉर्ड आपण मोडणे योग्य नसतं. काय करावं, काय करू नये, याचा विचार करत करतच तो दिवस ढकलावा लागतो. फक्त विचार ! कृती नाही !

**प्रश्न :-**

(१) परीक्षेच्या अगोदरचा दिवस कसा असतो ?
(२) परीक्षेच्या अगोदरचा दिवस कसा ढकलला जातो ?
(३) प्रत्यक्ष परीक्षेचा दिवस कसा जातो ?
(४) या उताऱ्यामध्ये परीक्षेची सर्वथा जाणीव कशी करून दिली आहे ?
(५) या उताऱ्यामध्ये "अभ्यासा" संबंधातील एकूण परिस्थिती दिसून येते का ?

**१३.** पुस्तकासारखा मित्र नाही असे म्हणतात. इतर मित्र आहेत, पण ते कधी रागावतात, कधी चिडतात, तर कधी चेष्टा करतात, कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत. कधी ते आपले अंतरंग खुले करत नाहीत. ते आपणांपासून काहीतरी लपवून ठेवतात. परंतु पुस्तकाचे तसे नाही. त्याला जवळ करण्याचा अवकाश की, ते आपले अंतरंग खुले करते. ते कधी फसवत नाही, कधी चुकवत नाही, नेहमी अगदी आपल्या सेवेस तयार असते.

पुस्तकांचे पुष्कळ प्रकार असतात. काही पुस्तक अल्पायुषी, तर काही दीर्घायुषी असतात. त्यांचे आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असते. विचार जितके स्थायी तितकी पुस्तके स्थायी. मासिकांचे आयुष्य एक महिना. परंतु काही पुस्तके सदासर्वकाळ बहुमोल असून तप्त मनाला समाधान देतात. भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद वगैरे ह्या प्रतीचे ग्रंथ होत.

**प्रश्न :-**

(१) पुस्तकासारखा मित्र नाही असे का म्हटले आहे ?
(२) पुस्तकाचे प्रकार कोणते ?
(३) भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद ह्या ग्रंथांचे वैशिष्ट्य कोणते ?
(४) इतर मित्र आहेत, पण ते कधी रागावतात असे का म्हटले आहे ?
(५) उताऱ्यास योग्य ते शीर्षक द्या.

**१४.** आमच्या जीवनातला प्रकाश आज गेला आहे. सर्वत्र काळोख पसरला आहे. काय सांगावे आणि कसे बोलावे ते कळत नाही. आमचा परमपूज्य नेता आम्हाला सोडून गेला आहे. इतकी वर्षे आम्ही त्याला डोळे भरून पाहात होतो. पण यापुढे तो आम्हाला दिसणार नाही. कोणत्याही बाबतीत आम्हाला मार्गदर्शन आणि सल्ला पाहिजे असला किंवा संकटाच्या

प्रसंगी धीर हवा असला तर आम्ही त्यांच्याकडे धाव घेत होतो. यापुढे आम्हाला मार्गदर्शन कोण करणार, धीर कोण देणार, आणि प्रकाश कोठून मिळणार ?

हा प्रकाश खरोखर गेला आहे काय ? नाही, तसे म्हणणे चूक आहे. या देशावर लकाकणारा हा प्रकाश काही सामान्य प्रकाश नव्हता. तो स्वर्गीय प्रकाश होता. तो यापुढेही या देशावर शेकडो वर्षे लकाकत राहील. साऱ्या जगाला तो चैतन्य देत राहील. असंख्य अंत:करणांना आधार देईल. याच प्रकाशाने आपल्याला स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला.

यापुढे आम्हाला बेजबाबदारपणे वागून चालणार नाही. कोणत्याही संकटाशी बेडरपणे आणि निर्धारपूर्वक सामना करण्यासाठी आम्ही सदैव तयार असले पाहिजे. या महान पुढाऱ्याने दिलेल्या आदेशांचे आणि शिकवणुकीचे आही निष्ठापूर्वक पालन केले पाहिजे. त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्याला दु:ख होईल असे यत्किंचितही गैरवर्तणुकीचे किंवा हिंसेचे कृत्य आमच्या हातून घडता कामा नये.

याचा अर्थ आपण कमकुवत बनले पाहिजे असा नाही. उलट, एकोप्याने व सर्व शक्तिनिशी आपण आपल्या समोरील अडचणींना तोंड दिले पाहिजे. आपल्यावर कोसळलेल्या या घोर संकटाच्या प्रसंगी आपण आपल्या क्षुल्लक मतभेदांना मूठमाती दिली पाहिजे आणि आपण सर्व एक झालो पाहिजे. हे महान संकट एक प्रकारचे आपल्याला आव्हान आहे. जीवनात जे काही महान असेल ते स्मरणात ठेवून ज्यांचा आजवर आपण फार विचार करीत आलो त्या क्षुल्लक गोष्टी सोडून देणे हाच या घटनेचा अर्थ आहे. त्यांच्या निश्चयाने जीवनातील महान्मंगल गोष्टींचा विचार करण्याला चालना मिळालेली आहे. वरील गोष्टी स्मरणात ठेवल्यातर भारताचे यापुढे निश्चित कल्याण होईल.

**प्रश्न :-**

(१) जीवनातला प्रकाश असे कोणाला संबोधले आहे ?
(२) प्रकाश गेल्यामुळे काय झाले आहे ?
(३) प्रकाशाने कोणता मार्ग दाखविला ?
(४) आपण कशासाठी सदैव तयार असले पाहिजे ?
(५) आपण कशाप्रकारे अडचणींना तोंड दिले पाहिजे ?

**१५.** डॉ.राधाकृष्णन हे खरेखुरे तत्वज्ञानी आहेत. "साधी राहणी आणि उच्च विचारसरणी"असे त्यांचे वर्तन असते. त्यांच्या शिष्टाचारात विलक्षण माद्रव असते. मोठमोठे राजकारणीही त्यामुळे दिपून गेले आहेत. त्यांचे वागणे म्हणजे नम्रता व डौल यांचे मोठे मनोहर मिश्रण आहे. ज्ञानामुळे ते विनयशील झाले आहेत, तसेच, त्यांचा आत्मविश्वासही वाढलेला आहे. तत्त्वाज्ञानी किंवा लेखक माणसे व्यवहारात नेहमी अपयशी ठरतात. त्यांना

राजदारबारात चमकणे किंवा राजकारण करणे जमत नाही. राधाकृष्णन त्याला अपवाद नाहीत. डॉ. राधाकृष्णन यांच्याइतका गौरव फार थेडयांच्या वाटयाला आला असेल. जगद्वंद्य गांधीजीपुढे ते एखाद्या विद्यार्थ्यांप्रमाणे बसत. गुरूवर्य टागोर किंवा न्यायमूर्ती रानडे यांच्याविषयी त्यांनी प्रगट केलेला गाढ आदर पाहिला म्हणजे राधाकृष्णन यांच्या लीनतेचे कल्पना येईल. राधाकृष्णन हे मुख्यतः तत्त्वज्ञ असले तरी, एकारलेले नाहीत. अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांची त्यांना गोडी आहे. अनेक क्षेत्रांतील माणसे त्यांच्याभोवती असतात. शरीर सुव्यवस्थित ठेवण्यास असा व्यायाम पाहिजे तसा मन प्रसन्नन ठेवण्यास आध्यात्मिक व्यायाम पाहिजे, असे त्यांचे मत आहे. त्यांनी पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानांचे कठीण ग्रंथ पचविले आहेत.

**प्रश्न :-**

(१) डॉ. राधाकृष्णन यांचे वर्तन कसे आहे ?
(२) डॉ. राधाकृष्णन यांचे वागणे कसे आहे ?
(३) डॉ. राधाकृष्णन कशासाठी अपवाद ठरले ?
(४) डॉ. राधाकृष्णन यांना कशाची गोडी आहे ?
(५) मन प्रसन्न ठेवण्यास काय केले पाहिजे असे डॉ. राधाकृष्णन यांचे मत आहे ?

**१६.** महाराष्ट्र हे भारतातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्र राज्याची १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ७.८९ कोटी आहे. या राज्यात १ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३३ शहरे आहेत. प्रशसकीय सोयीसाठी या राज्याची विभागणी ३१ जिल्हे व ३०३ तालुक्यात करण्यात आली आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात एकूण ४०,४१२ खेडी आहेत. या राज्यातील नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्याच्या प्रमाणात ३९ टक्के असून ग्रामीण लोकसंख्या ६१ टक्के आहे.

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक रचना आणि पर्जन्यमान वैशिष्ट्यपूर्ण आहे. या राज्यात पश्चिमेला अरबी समुद्र आणि सहयाद्री पर्वताच्या रांगा आहेत. त्याचप्रमाणे या राज्यात मराठवाडा व विदर्भाचा पठारी भाग आहे. उत्तरेला सातपुडा पर्वताच्या रांगा आहेत. नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा, वैनगंगा आणि भीमा या नद्यांची खोरी या भूप्रदेशाला वैशिष्टपूर्ण बनवतात. पावसाचे प्रमाण राज्याच्या विविध भागात ३० इंचापासून २०० इंचापर्यंत बदलत असते. महाराष्ट्राच्या भूपृष्ठावरील फार मोठा भाग काळया मातीच्या जमिनीने व्यापलेला आहे. विदर्भाच्या काही भागात व कोकणात तांबडया मातीची जमीन जास्त आढळते. काही भाग वनक्षेत्रांनी व्यापलेला तर काही खडकाळ, डोंगराळ दऱ्याखोऱ्यांनी. अनेक ठिकाणची जमीन छोटया-मोठया पाटबंधारे किंवा उपसा जलसिंचन योजनांच्या लाभक्षेत्राखाली आहे. थोडक्यात या राज्यात जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान आणि भूपृष्ठातील उंचसखलपणा यात अनेक प्रकारची विविधता आहे आणि ही बाब रस्ते बांधणी व त्यांच्या निरनिराळया दृष्टीने फार महत्त्वाची आहे.

**प्रश्न :-**

(१) महाराष्ट्र राज्य कसे आहे व या राज्याचे क्षेत्रफळ किती आहे ?
(२) प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्र राज्याची विभागणी कशी झाली आहे ?
(३) महाराष्ट्र राज्याची नागारी व ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी किती आहे ?
(४) महाराष्ट्र राज्याची भौगोलिक रचना कशी आहे ?
(५) महाराष्ट्राच्या भूपृष्ठावरील फार मोठा भाग कशाने व्यापला आहे ?

**१७.** पुत्र प्लेगाने आजारी असताही शांतपणे "केसरी" लिहिणारे लोकमान्य; दोन तपांहून अधिक काळ केवळ ध्यानात रमणारे अरविंद; "सरकारी धोरणाप्रमाणे पत्र चालवा, म्हणजे तुम्हाला मदत देऊ" असे बंगालचा गर्व्हनर सांगत असता "देशात एक तरी प्रामाणिक संपादक नको का ?" असे महणून निघून जाणारे "अमृतबझार पत्रिके" चे आद्य संपादक बाबू शिशिरकुमार घोष; नागपूरच्या सन १९२० मधील राष्ट्रीय सभेत असहकारितेचा ठराव मांडीत असता "अहरे, तुम्ही अजून बॅरिस्टरी चालवीतच आहात" असे श्रोत्यांतून कोणी म्हणताच "चित्तरंजन जे बोलतो ते करतो" असे गर्जणारे व दुसऱ्याच दिवशी सर्वत्याग करणारे देशबंधू; एके दिवशी मनात विषयवासना आली म्हणून स्वतः वर संतापून तापलेल्या तव्यावर जाऊन बसणारे विवेकानंद; आईने बोलावले म्हणून साहेब जाऊ देत नाही, असे पाहताच राजीनामा देणारे व वाटेत प्रचंड पूर आला असताही नदीत आईच्या नावाने उडी टाकणारे ईश्वरचंद्र विद्यासागर; "माझ्या पत्नीकडे २० वर्षे मी माता म्हणून पाहात आहे," असे सांगणारे महात्माजी; "चलाव तेरी गोली" असे म्हणून गुरखा शिपायासमोर आपली विशाल छाती उघडी करणारे स्वामी श्रद्धानंद; "गांधी टोपी काढ नाही तर गोळी झाडता" असे पिस्तुल रोखून सांगितले जात असताही अविचलउभे राहणारे सोलापूरचे वीर तुळशीदास जाधव; मोटारीखाली चिरडून घेणारा हुतात्का बाबू गेनू: गीतेचे स्मरण होताच रामनाम मनात येताच, तनू पुलकित होऊन ज्यांच्या डोळ्यांजतून घळघळ अश्रुधारा वाहू लागतात, अशी ही वर्ध्याची ज्ञानकर्मभक्तांची मूर्ती पूज्य विनोबाजी; "जगातील कोणती शक्ती आपल्या मोटारीवरचा झेंडा काढते ते बघू दे," असे गर्जणारे निर्भयमूर्ती ध्येयेरत जवाहरलाल.

**प्रश्न :-**

(१) साने गुरूजीनी कोणकोणत्या महान व्यक्तींचे स्मरण केले आहे? त्यांची नावे लिहा.
(२) ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी काय केले?
(३) बाबू गेनू कसा मरण पावला?
(४) गीतेचे स्मरण होताच विनोबाजींची काय अवस्था होते?
(५) बाबू शिशिरकुमार घोष यांनी संपादकाचा कोणता आदर्श ठेवला?

**१८.** मुंबई हे भारतातील एक सुंदर व मोठे शहर आहे. मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. येथील वस्ती सुमारे पन्नास लाख आहे. येथे अनेक जातीचे, पंथाचे व धर्माचे लोक सुखाने राहतात.

मुंबईत आरे दुग्ध वसाहत, जुहू, मलबार टेकडी, भारताचे प्रवेशद्वार, राणीचा बाग,

वस्तुसंग्रहालय इत्यादी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. मोठमोठ्या इमारती आहेत. लोकांची ने-आण करण्याकरिता स्थानिक आगगाड्या सतत धावत असतात. याशिवाय बसगाड्या, खाजगी व भाड्याच्या मोटारी यांची वाहतूक रात्रंदिवस चालू असते. येथील सचिवालयाची इमारत फारच भव्य आहे. राज्यपाल, मंत्री, सचिव वगैरे अधिकारी या शहरातच राहातात.

मुंबईचे हवामान सम आहे. पावसाळयात खूप पाऊस पडतो. हिवाळयात विशेष थंडी नसते. उन्हाळा फार कडक नसतो. सर्व ऋतूंमध्ये निरनिराळया प्रकारची फळे इथे मिळतात. येथे दुधाचा व भाजीपाल्याचा पुरवठा बाहेरून होतो.

येथे निरनिराळया प्रकारची महाविद्यालये आहेत. काही महाविद्यालयात संशोधनकार्य चालू असते. रुग्णालयेही मुंबई शहरात खूप आहेत. बऱ्याचशा रुग्णालयात मोफत औषधोपचार केले जातात. येथील मत्स्यालय पाहण्यासारखे आहे. ते पाहण्याकरिता दर रविवारी गर्दी लोटते.

येथील काही इमारतींना दहा मजले आहेत. अशा इमारतींत वर जाण्याकरिता व खाली येण्याकरिता लिफ्ट असते. चौपाटीवर व मलबार टेकडीवर फिरावयास जाण्यास चांगली जागा आहे. निरनिराळया लोकांच्या धर्माकरिता येथे देवालये व प्रार्थना-मंदिरे आहेत. परदेशातील लोक हे शहर पाहण्याकरिता येत असतात.

**प्रश्न :**

(१) मुंबई हे शहर कसे आहे?
(२) मुंबईत कोणती प्रेक्षणीय स्थळे आहेत?
(३) मुंबईचे ऋतू कसे आहेत?
(४) मुंबईतील बऱ्याचशा रुग्णालयांमधून कसे उपचार केले जातात?
(५) मुंबईतील निरनिराळया धर्मांच्या लोकांकरिता काय उपलब्ध करून देण्यात आले?

**१९.** "बंधूंनो, मी आज सांगतो ते ऐका. कारण आणखी एखादे वर्ष मला लाभेल असे वाटत नाही. या जागी पुन्हा मी दिसेन, वावरेन, बोलेन असे वाटत नाही. हा आजचा दिवस व हा महिना जसा सर्वांना पवित्र वाटतो ; त्याप्रमाणे सर्वांचे जीवन व मालमत्ता पवित्र माना. तुम्ही एकमेकांचे जीवन पवित्र माना. एकमेकांना सांभाळा. ईश्वरासमोर जाण्याची वेळ येईपर्यंत असे प्रेमाने व बंधुभावाने वागा. कोणाच्या प्राणांचा व घरादाराचा नाश करू नका. एके दिवशी ईश्वराच्या न्यायासनासमोर उभे राहावयाचे आहे. हे कधीही विसरू नका. त्या दिवसाची नेहमी आठवण ठेवा. तेथे सर्व कृत्यांचा झाडा द्यावा लागेल.

मित्रानों, पतीचे पत्नीवर काही हक्क आहेत, तसेच पत्नीचेही पतीवर आहेत. आपल्या बायकांना प्रेमाने व सहानुभूतीने वागवा. कठोर होऊ नका. दयाळू राहा. तुम्ही ईश्वराच्या जामीनकीवर आपल्या पत्नीचा स्वीकार केलेला असतो. खरे ना? परमेश्वराच्या

शब्दाने त्या तुमच्या कायदेशीर भार्या झालेल्या असतात, ही गोष्ट विसरू नका.

तसेच तुमच्यावर कोणी विश्वास टाकला तर त्याचा विश्वासघात करू नका. दिलेला शब्द पाळा. पाप टाळा. सावकारी निषिद्ध आहे. व्याजबट्टा व्यर्ज आहे हे ध्यानात धरा. पैसे उसने घेणाऱ्याने घेतले तेवढे परत करावे. व्याज देऊ नये, मुद्दलाची फेड व्हावी.

आणि प्राचीन काळापासून तुम्ही रक्ताचा सूड घेत आलात. खूनाचा बदला घेत आलात. परंतु आजपासून ते बंद होत आहे ही गोष्ट निषिद्ध आहे. आजपासून सारी सूडाची भाडणे रद्द झाली समजा.

आणि तुमचे गुलाम ; त्यांना नीट वागवा. तुम्ही खाल तेच त्यांना खायला द्या. तुम्ही कपडे घालाल तसेच त्यांना द्या. लक्षात ठेवा की, कसेही झाले तरी तेही खुदाचे बंदे आहेत. त्यांना कठोरतेने वागवता कामा नये.

मित्रांनो, माझे शब्द ऐका, नीट समजून घ्या. सारे लोक हे एकमेकांचे भाऊ आहेत हे कधीही विसरू नका. जे दुसऱ्याचे आहे ते त्यांन स्वेच्छेने, खुशीने दिल्याशिवाय त्याला हात लावू नका. अन्यायापासून व अन्याय करणाऱ्यापासून दूर राहा. सावध राहा.

जे येथे आज हजर आहेत त्यांनी हे सारे गैरहजर असल्यास सांगावे. येथे ऐकणाऱ्या-पेक्षाही ज्याला हे सांगितले जाईल तो कदाचित ते अधिकच लक्षात ठेवण्याचा संभव आहे.

**प्रश्न :**

(१) ईश्वरासमोर जाण्याची वेळ येईपर्यंत कसे वागा असे महंमदाने सांगितले आहे?
(२) आपल्याला एक दिवस कोठे उभे राहावयाचे आहे असे महंमद म्हणतात?
(३) कोणती गोष्ट निषिद्ध आहे असे महंमद म्हणतात?
(४) गुलामांना कसे वागवा असे महंमदने म्हटले आहे?
(५) सारे लोक कसे आहेत असे महंमद म्हणतात?

**२०.** एके दिवशी एक घोडेस्वार समुद्रकिनाऱ्याकडे चालला होता. रस्त्याच्या कडेला एक उपहारगृह होते तेथे तो आला. अंधार पडत होता. घोडेस्वार घोडयावरून खाली उतरला. समुद्रकाठच्या माणसांची मने समुद्रासारखी विशाल असतात. त्यांना कुठल्याही क्षुद्रतेची कल्पना येत नाही. हा घोडेस्वारही तसाच होता. दरवाजाजवळच्या एका झाडाला त्याने आपला घोडा बांधला व तोउपहारगृहात शिरला.

मध्यरात्र झाली, लोक गाढ झोपले. तेवढयात एक चोर तेथे आला व त्याचा घोडा घेऊन निघून गेला.

सकाळी घोडयाचा मालक जागा झाला. आपला घोडा चोरीस गेला हे त्याला समजले. या गोष्टीचे त्याला अतोनात दुःख झालेच, पण त्यापेक्षा त्याला अधिक दुःख झाले ते दुसऱ्या एका गोष्टीचे. ती म्हणजे, कुणातारी मनुष्याला चोरी करण्याची विपरीत बुद्धी उत्पन्न व्हावी, ही होय.

उपहारागृहात बरेच प्रवासी होते. त्यांना ही बातमी समजली. ते लगेच घोडेस्वाराभोवती जमले आणि मोठयाने बोलू लागले.

पहिला म्हणाला, "तबेल्याच्या बाहेर घोडा बांधण्याचा केवढा मोठा गाढवपणा केलास तू त्याचे फळ आहे हे."

दुसरा उद्गारला, "घोडयाला खोडा घातल्याशिवाय त्याला उघडयावर बांधणे हा निव्वळ मूर्खपणा आहे."

तिसरा म्हणाला, "या समुद्रतीराकडच्या भागात घोडयावरून प्रवास करण्यासारखा दुसरा वेडेपणा नाही."

चौथा म्हणाला, "ज्याला चालण्याचा कंटाळा असतो असे आळशी लोक घोडे विकत घेतात आणि त्याच्यावर बसून प्रवास करतात."

हे सारे उद्गार ऐकून तो प्रवासी चकित झाला. तो ओरडून म्हणाला, "मित्रहो, माझा घोडा चोरीस गेला हे तुम्हाला कळल्याबरोबर तुम्ही सारे माझे दोष दाखविण्याकरिता येथे मोठया प्रेमाने धावून आलात. पण ज्याने माझा घोडा चोरून नेला, त्याच्याविषयी निंदेचा एक शब्दसुद्धा तुमच्या तोंडून बाहेर पडू नये ही मोठी चमत्कारिक गोष्ट नव्हे काय?

**प्रश्न :**

(१) घोडेस्वार कोठे चालला होता?
(२) तो उपहारगृहात का गेला?
(३) त्याने घोडा बाहेर का बांधला?
(४) घोडेस्वाराला दुसरे कोणते दुःख झाले?
(५) इतर प्रवाशांनी कोणते उद्गार काढले?

**२१.** **शास्त्रीजी सापडले**

१९०४ च्या डिसेंबरातील ही घटना आहे. लालबहादूरजी त्यावेळी अवघे चार महिन्यांचे होते. छोटया लालबहादूरजींना घेऊन त्याची आई गंगा नदी पार करून जात होती. नावेत बरीच गर्दी होती. एवढयात त्या गर्दीत आईच्या कडेवरून छोटे लालबहादूरजी घसरले आणि बेपत्ता झाले. नावेत एकच हाहाःकार उडाला. त्या बिचाऱ्या मातेने बरीच शोधाशोध केली, आरडाओरड केली. पण छे, मुलाचा काही शोध लागला नाही. आईच्या कडेवरून

निसटलेले ते मूल पुढील होडीत बसलेल्या एका शेतकऱ्याच्या टोपलीत अलगदपणे जाऊन पडले होते. त्या शेतकऱ्याला वाटले गंगा मातेने दिलेला हा प्रसादच आहे. म्हणून त्याने मुलाला चार दिवस आपल्या घरी नेऊन त्याची चांगली बडदास्त राखली. पण शेवटी त्याला राहवेना आणि मग त्याने त्या मुंलाच्या आईचा शोध करून त्याला तिच्या हवाली केले.

**आणि एकदा असेही झाले**

एकदा शास्त्रीजींच्या निवासस्थानाच्या दारावरची विजेची घंटा वाजली. दार उघडले गेले आणि एक सडपातळ बांध्याची ठेंगू मूती दारात उभी राहिली. "मी आपल्या सेवेसी काय बरे करावे" मोठया अदबीने त्या व्यक्तीने दाराबाहेरच्या व्यक्तीला विचारले.

पाहुण्या माणसाने सांगितले, "कृपा करून मंत्रीमहोदयांना सांगा की, आपण जो लघुटंकलेखक मुद्दाम बोलावला होता तो आलेला आहे."

